**-: प्रेसनोट :-** दिनांक - २५/०४/२०२६

**गुन्हे शाखेकडून खुनाच्या गुन्हयातील दोन पाहिजे आरोपींना अटक करुन गुन्हा उघडकीस आणलेबाबत.**

नागपाडा पोलीस ठाणे गु.र.क्र. २४०/२०२६ कलम १०३ (१) बी.एन.एस. या गुन्हयात दिनांक २०/०४/२०२६ रोजी १८.३० वाजता इसम नामे मोहम्मद इक्बाल सलीया, वय ७८ वर्षे यांचा त्याचे नागपाडा येथील राहते घरी आरोपी क्रमांक १, वय २९ वर्षे याने चाकुने वार करुन खुन केल्याने नमुद गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखेकडून सुरु असताना गुन्हयात तांत्रिक तपास, तसेच मानवी तपास कौशल्य वापरुन विश्वसनीय गुप्त बातमीदार तयार करुन केलेल्या तपासात सदरचा गुन्हा आरोपी क्रमांक १, वय २९ वर्षे व त्याचा मित्र आरोपी क्रमांक २, वय २५ वर्षे यानी केला असल्याची खात्रीलायक माहिती प्राप्त झाली.

दोन्ही आरोपी हे त्यांचे राहते वास्तव्याचे ठिकाण व वापरते मोबाईल हॅण्डसेट बंद करुन, मुंबईबाहेर इतर राज्यात जागा बदलून वास्तव्य करुन पोलीस अटकेपासून योग्यती खबरदारी घेत होते. गुन्हे शाखेने केलेल्या कौशल्यपुर्ण तांत्रिक व मानवी तपासामध्ये दोन्ही आरोपी हे नागपुर येथे लपुन वास्तव्य करीत असल्याची खात्रीलायक माहिती प्राप्त झाली. त्याप्रमाणे त्वरीत पथक पाठवून नागपूर परिसरात आरोपींचा शोध घेता, ते दिनांक २४/०४/२०२६ रोजी बडा ताजबाग परिसर, नागपूर येथे मिळून आले.

आरोपींकडे केलेल्या तपासात यातील आरोपी क्रमांक १, वय २९ वर्षे हा इनकाउंटर झालेले कुप्रसिद्ध गॅगस्टर सादिक कालीया (१९९७) व आरीफ कालीया (२००२) यांचा पुतण्या असून, त्यास संशय होता की, त्यांचे काका सादिक कालीया व आरीफ कालीया यांचे इनकाउंटरमध्ये यातील मयत इसम इक्बाल सलिया हा खबरी होता. त्याचा राग मनात धरुन आरोपी क्रमांक १ वय २९ वर्षे याने त्याचा मित्र आरोपी क्रमांक २, वय २५ वर्षे याचे मदतीने सदरचा गुन्हा केला असल्याचे समजून आले.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) मुंबई श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. राज तिलक रौशन व मा. सहा. पोलीस आयुक्त, प्रकटीकरण (मध्य) श्री. सदानंद राणे यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष -३ चे प्रभारी पोलीस निरीक्षक सदानंद येरेकर, स.पो.नि. अमोल माळी, सफौ. घाटकर, सफौ. पालांडे, पोह. विनोद परब, पो.ह. रविंद्र देवार्डे, पो.ह. अशोक पाटील, पो.ह. वासुदेव परब, पो.ह. वैभव गिरकर, पो.शि. विकास चव्हाण व पो.शि.मारुती खेडकर यांनी पार पाडली आहे.

.........................................................................................................